दै. गोदातीर दि: 14/01/25

# दोन जिम ट्रेनरवर हल्ला करून दरोडा टाकणाऱ्या पाच जणांना अटक

## चार दुचाकी व एक खंजर जप्त; ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- मित्राला दुचाकीवरून घरी सोडण्यासाठी जाणाऱ्या दोन जिम ट्रेनरवर आरोपींनी चाकुने हल्ला करणाऱ्या पाच आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून चार दुचाकी आणि एक खंजर व दुचाकी जप्त करण्यात आली आहे. सदर घटना पीव्हीआर मॉल नवीन कौठा येथे शुक्रवारी रात्री साडेअकराच्या सुमरास घडली होती.

दि. १० रोजी पुरूषोत्तम दिपक कापरे, विवेक समाधान तराळे व शेख युसुफ शेख चॉंदपाशा हे तिघे ईलाईट फिटनेस जिममध्ये ट्रेनर रात्री दुचाकी व स्कुटीने शेख युसुफ यास घरी सोडण्यासाठी निघाले होते. पीव्हीआर मॉल नविन कौठा येथे वेळ अंदाजे रात्री साडेअकराच्या सुमारास तोंडाला कपडा बांधुन दुचाकीवरून आलेल्या आरोपीतांनी कापरे यास ये इधर क्या देख रहा, असे म्हणुन शिवीगाळ केली, याचा जाब विचारले असता, चार आरोपीतांनी खंजर काढून या तिघां मित्रांना तुम्हारे पास क्या है निकाल असे म्हणुन झटापट सुरू केली. यात एका आरोपीने कापरे याच्या उजव्या दंडावर तर दुसऱ्या एकाने साक्षीदार विवेक याचे चेहऱ्यावर खंजरने मारून जखमी केले होते. तसेच विवेक तराळे याच्या दुचाकीची तोडफोड केली होती. तर शेख युसुफ यांची स्कुटी चोरून नेली. या प्रकरणी पुरुषोत्तम कापरे, वय २५ रा. लोकमित्रनगर, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण ठाण्यात विविध कलमासह शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर आणि पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांची टीम यांनी पाच आरोपींना अटक केली. दर्शन अंकुशराव टाक (वय २१), अभिजीत नामदेव चव्हाण (वय २०), महेश आनंदा शिंदे (वय २१ तिघे राहणार शंकर नगरी वसरणी, नांदेड), आदित्य रामदास सोनमनकर (वय १८ राहणार सिद्धनाथ पुरी शंकराचार्य मठ चौफळा नांदेड) आणि प्रसाद दत्ता फुलारी (वय २२ राहणार मेहबूबनगर मालटेकडी नांदेड) यांना अटक केली. त्यांच्याकडून वेगवेगळ्या चार दुचाकी आणि एक खंजर असा एक लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.